# <u>दिनांक 06.11.2020 रोजीची लातूर जिल्हा निर्यात **प्रचालन** समिती **बैठकीचे** इतिवृत्त</u>

जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक 06.11.2020 रोजी सकाळी 11.00 वाजता मा.श्री. जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी, लातूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे संपन्न झाली. सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर तथा सदस्य सचिव निर्यात प्रचालन समिती यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने बैठकीस सुरूवात झाली, त्यानंतर महाव्यवस्थापक यांनी PPT द्वारे प्रास्ताविक करून समितीची रचना व कार्ये यांची सविस्तर माहिती दिली. बैठकीस एकून 24 समिती सदस्य, उद्योजक, निर्यातदार व मा. श्री कृष्णा दास, अधिकारी विदेश व्यापार महानिदेशालय, पुणे (DGFT) उपस्थित होते व मा. प्रविण नलावडे, उपसंचालक, DGFT, पुणे यांनी VC द्वारे मार्गदर्शन केले.

केंद्रशासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या विदेश व्यापार महानिदेशालय, नवी दिल्ली (DGFT) यांच्या 26.12.2019 च्या पत्रान्वये व उद्योग, उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. 19.10.2020 च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरीय जिल्हा प्रचालन समितीची स्थापना करण्यात आली आहे. लातूर जिल्हातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व राज्यशासनाची जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यातदार, निर्यात सल्लागार यांचेशी सातत्याने समन्वय साधून अडीअडचणी दुर करण्याच्या उद्देशाने सदर समिती काम करणार आहे.

सदर सभेत झालेल्या चर्चेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दा उपस्थित करणाऱ्यांचे नाव | मुद्द्यांचे स्वरूप | चर्चेअंती अध्यक्षांनी दिलेल्या कार्यवाहीचे निर्देश | संबधीत कार्यालय |
|---|---|---|---|---|
| 1. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर | जिल्हा निर्यात आराखडा तयार करणे साठी स्टेक होल्डर्स कडून सुचना मागविणे. | मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा मध्ये निर्यातक्षम कृषी व औद्योगिक उत्पादनाची माहिती घेवून यादी करणेबाबत निर्देश केले. तसेच संबधीत यंत्रणा व उपस्थित सदस्य यांचेकडून निर्यात वाढीसाठी उपयुक्त सुचना, अडचणी याबाबत लेखी निवेदन जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर करण्याबाबत निर्देश दिले | जिल्हा उद्योग केंद्र, लातूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | श्री. विकास देशपांडे, कृषी उत्पादने निर्यातदार | खाजगी शीतगृहामधील उत्पादनावर बँकेकडून अर्थसहाय्य मिळत नसल्याबाबत | मा. जिल्हाधिकारी यांनी LDM यांना सदर बाबीत विशेष लक्ष देवून सर्व बँकाना सुचना देवून अहवाल द्यावा तसेच बँकामार्फत निर्यातीसाठी च्या योजनांची माहिती व दिलेल्या अर्थसहाय्याची माहिती समितीला सादर करावी असे सुचित केले.<br>जिल्हातील निर्यात होणारी उत्पादने, निर्यातदार यांचेकडून सेक्टर निहाय जीएसटी उत्पादनाची माहिती व पुरक योजनांची माहिती जी एस टी विभागाने समितीला द्वावी असे सुचित केले. | जिल्हा अग्रणी बँक, लातूर<br>जिल्हा वस्तु व सेवाकर अधिकारी, लातूर |
| 3. | श्री. वामन धुमाळ, लघु उद्योग भारती संघटना, लातूर | घातक रसायने पॅकेजींग करिता सर्टिफिकेट बाबत इंडीयन इन्स्टीट्युट ऑफ पॅकेजींग, मुंबई ची फी जास्त आहे, त्यामुळे सदर सुविधा जिल्हा स्तरावर उपलब्ध होणेबाबत मागणी केली. | मा. जिल्हाधिकारी यांनी सदर सर्टिफिकेट बाबतचे अडचणी बाबत निवेदन विदेश व्यापार महानिदेशालय, पुणे (DGFT) यांच्याकडे सादर करावे असे सुचित केले. | विदेश व्यापार महानिदेशालय, पुणे (DGFT) |
| 4. | श्री. ज्ञानेश्वर टोडतले, निर्यातदार, केशर अंबा, लातूर | कृषी उत्पादने निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करणे, ट्रान्सपोर्ट सबसिडी सुधारणा करणे | मा. जिल्हाधिकारी यांनी कृषी उत्पादने निर्यात सुविधा केंद्राची स्थापना करणे व G I नोंदणी, APEDA नोंदणी करिताची कार्यपद्धतीची माहिती जिल्हास्तरावर उपलब्ध करण्यात यावी तसेच APEDA यांनी निर्यातीबाबत SOP प्रशिक्षण द्यावे. ट्रान्सपोर्ट सबसिडी सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय व आत्मा विभांगानी सादर करावा व निर्यातीसाठी FPO यांना मार्गदर्शन करावे असे सुचित केले. | विदेश व्यापार महानिदेशालय, पुणे (DGFT), APEDA, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय व आत्मा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | श्री. गणेश पाटील, पणन महामंडळ | कृषी उत्पादनाकरिता APEDA मार्फत शितगृह भाजीपाला सुकविणे इ सुविधा बाबत | मा. जिल्हाधिकारी यानी कृषी उत्पादनाकरिता APEDA मार्फत शितगृह भाजीपाला सुकविणे इ सुविधा पुरविल्या जातात याची व्यापकरिता प्रसिद्धी व मार्गदर्शन करणेबाबत निर्देश दिले. | APEDA, पुणे/ पणन महामडळ लातूर |
| 6. | श्री. अमोल ढोणे, मशरुम उत्पादक, रेणापूर | स्वीट कॉर्न व मशरुम निर्यातीसाठी वाव असून त्याची लागवड/उत्पादन करणेसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, आत्मा व APEDA, पुणे विभागाने backward linkage करिता शेतकऱ्यांचे मेळावे घेवून प्रोत्साहित करावे असे मा. अध्यक्षांनी सुचित करावे. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, आत्मा व APEDA, पुणे |
| 7. | श्री. प्रविण राठी, लातूर उद्योग समुह लातूर | Certificate Of Origin मिळणेबाबत व निर्यात वाहतुक अनुदान मिळणेबाबत | सदरचा प्रस्ताव श्री. राठी यांनी विदेश व्यापार महानिदेशालय, पुणे (DGFT) यांचेकडे सादर करावा, असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | DGFT |
| 8. | श्री. नितीन कलंत्री, कलंत्री उद्योग समूह,<br>श्री. रतन बिदादा, दाळ मिल, लातूर | दाळ निर्यातीसाठी Export incentive मिळावेत, शेतकऱ्याकडून थेट खरेदीस परवानगी द्यावी,DGFT/ APEDA यांनी प्रक्रियेबाबत सविस्तर प्रशिक्षण द्यावे., लातूर दाळीसाठी GI मिळणेसाठी प्रयत्न व्हावेत. | DGFT/ APEDA यांनी प्रशिक्षणाचे नियोजन करावे. व कृषी विभागाने लातूर दाळीसाठी GI मिळणेसाठीचा प्रस्ताव निकषानुसार तयार करावा, असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, DGFT व APEDA |
| 9. | श्रीमती वैशाली शेठ, वुड टूल्स, लातूर | निर्यातीसाठी Export Buyer Market Data उपलब्ध व्हावा. Organic farming Scheme ची माहिती मिळावी. | DGFT व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय यांनी सदर माहिती उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | DGFT व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10. | श्री ब्रम्हानंद मुर्के निर्यातदार, कुरक्युमीन, लातूर | कृषी विभागाने 5 ते 6 टक्के कुरक्युमीन असलेले हळदीचे व्हरायटीची उत्पादन वाढीकरिता माहिती उपलब्ध करून द्यावी. देश निहाय निर्याची मानकांची माहिती उपलब्ध करून द्यावी | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय व APEDA यांनी माहिती उपलब्ध करून प्रसिद्धी द्यावी, असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. | APEDA व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय |
| 11. | मा. श्री. प्रविण नलावडे, उपसंचालक, DGFT, पुणे | या बाबत मा. श्री प्रविण नरवडे यांनी सभेस VC द्वारे उपस्थित राहीन सविस्तर मार्गदर्शन केले व जिल्हा स्तरावर Export Potential ओळखुन सर्व शासकीय व बिगर शासकीय स्टेक होल्डर यांचेकडून इनपुट घेवून Export Hub साठी निर्यात कृती आराखडा तयार करणेबाबत माहिती दिली. | या बाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सर्व स्टेक होल्डर यांचेकडून माहिती संकलन जिल्हा उद्योग केंद्राने करावे व दि. 31.12.2020 पर्यंत DGFT यांनी जिल्हा चा आराखडा अंतिम करण्याबाबत निर्देश दिले. | DGFT व जिल्हा उद्योग केंद्र, लातूर |

बैठकीच्या शेवटी मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानुन बैठक संपन्न झाली.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, लातूर
तथा सचिव, जिल्हा प्रचालन समिती, लातूर

जिल्हाधिकारी
**तथा अध्यक्ष जिल्हा प्रचालन समिती, लातूर**